**वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट**

**अंक १९ वा**

**दिनांक ०४/०५/२०२० ते दिनांक ०८/०५/२०२०**

**पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.**

**जावक क्रमांक :-** 2695 **दिनांक :-** 01 JUN 2020

---

**भाग- १ :-**

**बदली :- निरंक**

**पदोन्नती :- निरंक**

**नेमणुक :- निरंक**

**भाग-२ :-**

**रजा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पी-६७(१)/पोशि-२८०, महादेव/कर्तव्यावर हजर/२०३०/२०२० वाशिम दिनांक :- २७/०३/२०२० अन्वये पोशि/२८०, महादेवराव भिमटे, नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम येथे नेमणुकीस असतांना त्यांची दिनांक २५/०१/२०२० रोजी २०.१० वाजता दवाखाना आरोपी गार्ड डयुटी लावण्यांत आली असता ते सदर डयुटीवरुन वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहीले. त्यांना सदर डयुटीबाबत मोबाईल फोनव्दारे कॉल केला असता त्यांनी सदर कॉलला प्रतिसाद दिला नाही. व कर्तव्यावरुन अनाधिकृत पणे गैरहजर राहले. सदर पोशि हे दिनांक २७/०३/२०२० रोजी कर्तव्यावर होण्यासाठी आल्याने त्यांना मा. पोलीस अधिक्षक, वाशिम यांचे दालनात हजर करुन घेण्यांत आले. नमुद पोशि यांना दिनांक २७/०३/२०२० चे म. पुर्व कर्तव्यावर हजर करुन घेण्यांत येत आहे. सदर नमुद केलेल्या दिनांकास कर्तव्यावर हजर न झाल्यास त्यांचा कसुरी अहवाल उलट-टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा. करीता नमुद पोशि यांचा गैरहजर कालावधी हा दिनांक २५/०१/२०२० ते २६/०३/२०२० पर्यंत ६२ दिवस विनवेतन रजा मंजुर करण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि,-३/अर्जित रजा/मपोशि-१२७६/२२६९/२०२०, वाशिम दिनांक :- ०४/०५/२०२० अन्वये मपोशि/१२७६, सुप्रीया रघुनाथ डोंगरे नेमणुक पो.स्टे. मानोरा यांना त्यांच्या मुलीची तब्येत खराब असल्याचे कारणास्तव दिनांक २९/०४/२०२० पासुन १० दिवस अर्जिम रजा मंजुर करण्यात येत आहे. नमुद पोलीस कर्मचारी यांचे रजेवर गेल्याचे व हजर झाल्याचे दिनांक, वेळ व स्टे.डा.क्रमांकासह अहवाल उलट-टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:पोअवा/आलि-२/मपोशि-१२८७/ सिक हजर/२३१५/२०२०, वाशिम दिनांक ०८/०५/२०२० अन्वये मपोशि/१२८७, पुष्पा कांबळे नेमणुक पो.मु. वाशिम हे दिनांक ०४/०१/२०२० पासुन प्रकृती खराब असल्याने सिक पास न घेता सिक /गैरहजर होते. ते आज दिनांक ०८/०५/२०२० रोजी आपले मार्फतीने सिक रजेवरुन कर्तव्यावर हजर होणेकामी मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांचे आज्ञांकीत कक्षात आले असता त्यांना त्यांचे विनंतीनुसार सिक मधुन आज दिनांक ०८/०५/२०२० रोजीचे मा. नंतर पासुन कर्तव्यावर हजर करुन घेण्याबाबत आदेश दिले आहे. करीता नमुद मपोशि/१२८७, पुष्पा कांबळे नेमणुक पो.मु.वाशिम यांना कर्तव्यावर हजर करुन घेवुन त्यांचा त्याबाबतचा पुर्तता अहवाल उलट-टपाली या कार्यालयास सादर करावा तसेच नमुद मपोशि/१२८७, पुष्पा कांबळे नेमणुक पो.मु.वाशिम हे वेळेवर कर्तव्यावर हजर न झाल्यास त्यांचा कसुरी अहवाल उलट-टपाली न चुकता या कार्यालयास सादर करावा. मपोशि/१२८७, पुष्पा कांबळे नेमणुक पो.मु. वाशिम यांचे दिनांक ०४/०१/२०२० ते दिनांक ०८/०५/२०२० पावेतो १२६ दिवस विनावेतन रजा मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पांअवा/पशा-१/ का. अ. त्रिनगरीवार / अर्जित रजा/२३१६/२०२० वाशिम दिनांक :- ०८/०५/२०२० अन्वये श्रीमती मंगला एस. त्रिनगरीवार, कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक, कार्यालय, वाशिम यांना त्यांच्या गावी गडचिरोली येथे स्वगावी जाणेकरीता दिनांक ११/०५/२०२० ते १५/०५/२०२० अशी ०५ दिवस अर्जित रजा व दिनांक ०९,१०,१६, व १७/०५/२०२० रोजची शासकीय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याच्या परवाणगीसह रजा मंजुर करण्यात येत आहे. श्रीमती मंगला एस. त्रिनगरीवार, कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक, कार्यालय, वाशिम यांचे रजा कालावधीत त्यांच्याकडील कार्यालय अधिक्षक पदाचा अतिरीक्त कार्यभार प्रमुख लिपीक श्री. विनोद झाडे, नेम. लेखाशाखा प्रमुख, पोलीस अधिक्षक, कार्यालय, वाशिम हे पाहतील तरी श्रीमती मंगला एस. त्रिनगरीवार, कार्यालय अधिक्षक यांनी रजा वाढवु नये तसेच रजेवरुन वेळेवर परत यावे. श्रीमती मंगला एस. त्रिनगरीवार, कार्यालया अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील आहरण व संवितरण अधिकारी या पदाचा अतिरीक्त कार्यभार श्री.श्रीराम घुगे, पोलीस निरीक्षक, नेमणुक जिवीशा, वाशिम हे पाहतील.

**परवानगी :- निरंक**

**भाग -३ :-**

**बढती :- निरंक**

**पगार:- निरंक**

**भाग -४ :-**

**बक्षिस:- निरंक**

**भाग -५ :-**

**शिक्षा :- निरंक**

**निलंबन :- निरंक**

**भाग -६ :-**

**प्रशिक्षण व इतर :-**

**प्रशिक्षण:- निरंक**

**इतर. :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्था/३३-क/सेवानिवृत्ती/पो.कर्म./२२६६/२०२०, वाशिम. दिनांक :- ३०/०४/२०२० अन्वये सेवानिवृत्ती बाबत खालील नमुद पोलीस कर्मचारी हे दिनांक ३०/०४/२०२० रोजी वयाचे ५८ वर्ष पुर्ण करीत असल्याने त्यांना नियत वयोमानानुसार दिनांक ३०/०४/२०२० रोजीचे मा. नंतर पासुन या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त होणारे कर्मचाऱ्यांचे नांव पदनाम/ब.नं. | नेमणुकीचे ठिकाण | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | पोहवा/७८, श्रीकृष्णा नारायण गवई | पो.स्टे.मानोरा | ३०/०४/२०२० |
| २. | पोहवा/८१६, सुनिल किसनराव खरात | पो.स्टे. अनसिंग | ३०/०४/२०२० |

२/- वर नमुद पोलीस कर्मचारी हे दिनांक ३०/०४/२०२० रोजीचे मा. नंतर पासुन सेवानिवृत्त करण्यात येत असुन त्यांचे नाव सेवानिवृत्तीचे दिनांकापासुन या आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्था/का.क्र.२९/परि.स्त.से.प्रशि/२३०३/२०२० वाशिम दिनांक :- ०६/०५/२०२० अन्वये परिक्षेत्री स्तरावर सेवांतर्गत प्रशिक्षणाकरीता निधी मिळणे बाबत. पोनि. पोलीस कल्याण शाखा, वाशिम. या आस्थापनेवरील खालील प्रमाणे परिक्षेत्रीय स्तरावर पोलीस अधिकारी यांचे सेवातंर्गत प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणाकरीता उपस्थित पोलीस अधिकारी यांना राहण्याची, जेवणाची त्याच प्रमाणे प्रशिक्षणार्थी करीता लागणारे साहित्या पेन, डयारी, प्रमाणपत्रे ईत्यादी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा खर्च सेवातंर्गत प्रशिक्षण निधीमधुन ( २८ Profesional Service ) या उध्दिष्ठाखालील अनुदानातून एकुण रु. ७५,२९०/-( अक्षरी रुपये

पंच्याहत्तर हजार दोनशे नव्वद फक्त ) मंजूर करण्यात आले आहे. करीता सदरची रक्कम पोनि. पोलीस वाचक शाखा यांना अदा करण्यात यावी.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचा विषय | प्रशिक्षणाचा कालावधी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १. | सायबर व मोबाईल फॉरेन्सीक | दि. ०५/०३/२०१९ ते दि. ०६/०३/२०१९ | ७३५० |
| २. | व्यक्तीमत्व विकास | दि. ०७/०३/२०१९ ते दि. ०८/०३/२०१९ | ८०५० |
| ३. | भावनीक बुध्दीमत्ता | दि. २८/०३/२०१९ ते दि. ३०/०३/२०१९ | ९१५० |
| ४. | भावनीक बुध्दीमत्ता | दि. २७/०६/२०१९ ते दि. २९/०३/२०१९ | १४३८० |
| ५. | विचारपुस तंत्र | दि. ०२/१२/२०१९ ते दि. ०३/१२/२०१९ | ८२८५ |
| ६. | मालमत्तेच्या गुन्हयांचा तपास | दि. १६/१२/२०१९ ते दि. १७/१२/२०१९ | ८४७५ |
| ७. | भावनीक बुध्दीमत्ता | दि. २८/१२/२०१९ ते दि. ३१/१२/२०१९ | १४८०० |
| ८. | मनुष्यवधाच्या गुन्हयांचा तपास | दि. १३/०१/२०२० ते दि. १४/०१/२०२० | ४८०० |
| | | एकुण | ७५,२९० |

या कर्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि.-२/से.नि./पो. कर्म/२३१४/२०२० वाशिम दिनांक :- ०८/०५/२०२० अन्वये सेवनिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मिळणेबाबत खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास सेवानिवृत्त झाले आहेत.

| अ.क्र. | सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे नाव, पदनाम व ब.नं | तत्कालीन नेमणुकीचे ठिकाण | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सपोउपनि/४१६, कैलास नामदेव ठोसरे | पो.स्टे. कारंजा शहर | ३१/१२/२०१९ |
| २. | से.नि., पोहवा/६०२, सागर रामभाऊ जाधव | पो.स्टे.धनज | ३१/०१/२०२० |
| ३. | पोहवा/५९६, सुभाष बापुराव चौधरी | कारंजा ग्रामीण | ३१/०३/२०२० |
| ४. | सपोउपनि/८६३, अशोक आत्माराम चव्हाण | आसेगांव | ३१/०३/२०२० |
| ५. | पोहवा/विजतंत्री आरुण विश्वनाथ बडवे | बिनतारी संदेश विभाग | ३१/०३/२०२० |

२/- वर नमुद सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांचे अंतिम अर्जित रजचे रोखीकरण करण्याकामी त्यांचे प्रलंबित असलेले सिक अहवाल तसेच त्यांचे विरुध्द कोणती चौकशी, वसुली सुरु आहे किंवा कसे ? या बाबतची माहिती तात्काळ सादर करावी जेणेकरुन वर नमुद सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांचे अंतीम अर्जित रजेचे रोखीकरण करणे सोईचे होईल.

**( वसंत परदेशी )**
**भा.पो.से.**
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी करणेबाबत /पत्रव्यहार शाखा लिपीक-१/डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक १९ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्याात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

-----ooooo-----